ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक
# विशेषांक

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 33. | **आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक**<br>- प्रा. सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 135 - 137 |
| 34. | **वामनदादा कर्डक यांच्या गीतरचनेतील शैलीविशेष – गेयता**<br>- डॉ. जया जितेंद्र कदम | 138 - 141 |
| 35. | **महाकवी वामनदादा कर्डक : आंबेडकरी तत्वज्ञानाचा काल-आज व उद्याचा चेहरा**<br>- प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 142 - 145 |
| 36. | **लोककवी वामनदादा कर्डक यांची स्त्रीगीते**<br>- डॉ. देवमन दत्तुजी कामडी | 146 - 155 |
| 37. | **वामनदादा कर्डक यांची गझल रचना**<br>- डॉ. सुखदेव इघारे | 156 - 159 |
| 38. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन**<br>- प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | 160 - 166 |
| 39. | **वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता**<br>- डॉ. राजाराम अं. झोडगे | 167 - 170 |
| 40. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील सामाजिक बांधिलकी : शोध व स्वरूप**<br>- प्रा. निखिल भिकाजी उंबरकर | 171 - 173 |
| 41. | **तुकोबांच्या कुळातील लोककवी : वामनदादा कर्डक**<br>- प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये | 174 - 178 |
| 42. | **आंबेडकरी चळवळीचा तेजोमय दीप**<br>- प्रोफेसर डॉ.शैलेश विश्वनाथ त्रिभुवन | 179 – 181 |
| 43. | **आंबेडकरवादी लोकशाहीर वामनदादा कर्डक**<br>- प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना | 182 - 184 |
| 44. | **लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते**<br>- प्रा. डॉ. विलास खुणे | 185 - 187 |
| 45. | **शोषितांचा हृदयस्पर्शी आवाज : महाकवी वामनदादा कर्डक**<br>- प्रा.डॉ. संबोधी एम. देशपांडे | 188 - 191 |
| 46. | **लोककवी वामनदादा कर्डक यांची राष्ट्रीय कविता**<br>- प्रा.डॉ. विश्वास शं. पाटील | 192 - 194 |
| 47. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजीकता**<br>- डॉ. रंजना मधुकर कदम | 195 – 200 |
| 48. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान**<br>- प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे | 201 – 204 |
| 49. | **लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे स्वरुप आणि विचार**<br>- प्रा.डॉ. चंद्रशेखर निवृत्ती एंगडे, प्रा. संजय नामदेवराव आठवले | 205 - 210 |
| 50. | **वामनदादा कर्डक यांच्या गीतांतून आलेले डॅ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार**<br>- डॉ. गणेश मोहिते | 211 - 214 |




Scanned by CamScanner



# वामनदादा कर्डक यांच्या गीतांतून आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी विचार

- **डॉ. गणेश मोहिते**

सहाय्यक प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

बलभीम महाविद्यालय

---

**प्रस्तावना**

वामनदादा कर्डक यांच्या कवितेची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत.बाबासाहेबांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा वामनदादा कर्डक यांच्या कवितेवर व गीतांवर प्रभाव आहे. मानवमुक्तीच्या लढ्यात वामनदादा कर्डक हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली एक शिपाई म्हणून सामील झाले त्यावेळी आंबेडकरी चळवळ सर्वत्र जोमाने सुरू झाली होती. प्रत्येक अस्पृश्य भीमसैनिक बनून समतेच्या लढ्यात सामील झाला होता. वामनदादासुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभेला जात. मानवमुक्तीच्या लढ्यात विजय आपलाच होणार हा विश्वास वामनदादाच्या कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान हा वामनदादांच्या कवितेचा जीवनाधार आहे वामनदादांच्या काळातील सर्व वातावरणच आंबेडकरमय झाले होते या वातावरणाचा एक घटक म्हणजे वामनदादा कर्डक होत.

उत्तम कांबळे म्हणतात त्याप्रमाणे, "वामनदादांच्या बोलण्यात भीम, वागण्यात भीम, गाण्यात भीम, जगण्यात भीम, आयुष्याच्या प्रत्येक श्वासात भीम, लढण्यात भीम, प्रत्येक प्रश्नांच्या इलाजात भीम असे एक भारावलेपण घेऊन वामनदादा जगले. आपला जन्मच भीम विचारांच्या प्रसारासाठी आणि समाजाला जागे करण्यासाठी आहे. या न्यायाने ते जगले. शब्द भिमाचे, आवाज भिमाचा, जगण्याची प्रेरणा भिमाची, स्वाभिमानी जगाची निर्मिती ही भिमाची अशाप्रकारे वामनदादांच्या जीवनाचा कणकण अवघा भीममय होऊन गेला होता."[१]

वामनदादांच्या गीताने सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत आपली विशेष भूमिका निभावली. आंबेडकरी विचार हे त्यांच्या गीतांचे एक साधन बनले त्यामुळे त्यांच्या गीतांचे कलात्मकतेपेक्षा वैचारिक अधिष्ठान हेएक वैशिष्ट्य आहे. महाकवी वामनदादा कर्डक यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल घेऊन निघालेला आंबेडकरवाद यांच्या पहिल्या



Scanned by CamScanner